**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
I : Chairman (P) : STD . (020)-25651751 I EPABX -25705000 Fax : 25665807 I Secretary(P) : 25651750

**महत्वाचे/तातडीचे**

क्र.रा.मं./परीक्षा-२/8691
पुणे - ४११००४
दिनांक-~~२१~~/१२/२०१६.
23

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :-** उच्च माध्यमिक इ. ११ वीच्या विदयार्थ्यांसाठी उत्तीर्णतेचे सुधारित नियम (Rules Of Promotion) लागू करणेबाबत.

**संदर्भ -** १. या कार्यालयाचे शासनास पाठविण्यात आलेले पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/३०६०, दिनांक-१८/०५/२०१६.
२. शासन पत्र क्र.परीक्षा-२०१६/प्र.क्र.१८९/एसडी-२ दि.२८/१०/२०१६

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक अंतर्गत इयत्ता ११ वीचा अभ्यासक्रम पुनर्रचित केला असल्याने इयत्ता ११ वीच्या उत्तीर्णतेच्या निकषामध्ये बदल करणे आवश्यक होते. सन २००७ नंतर यामध्ये बदल केलेला नाही. यापूर्वीच्या निकषामध्ये इयत्ता ११ वी साठी अनुग्रह गुण ३० दर्शविले आहेत मात्र इयत्ता १२ वी साठी अनुग्रह गुण १५ देण्यात येत असून दोन्ही मध्येही तफावत आहे. इयत्ता १२ वी ला जे अनुग्रह गुण दिले जातात तेच गुण (१५ गुण) इयत्ता ११वी साठी असणे आवश्यक होते.

सबब याबाबत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्य मंडळ समिती ठरावानुसार इ.१२ वी प्रमाणेच इ.११ वी परीक्षेस १५ अनुग्रह गुण देण्यासाठी कार्यवाही करणेस शासनाची मान्यता मिळणेसाठी संदर्भ क्र.१ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता व संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये शासनाने राज्य मंडळ नियमावली नियम क्र. ९९ मधील ३ नुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी असणाऱ्या तरतुदीप्रमाणे इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी पूर्वीच्या निकषानुसार असलेले ३० गुण बदलून १५ गुण अनुग्रह गुण म्हणून देण्यास मान्यता दिलेली आहे. तरी याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसंबंधात मंडळ नियमावली नियम क्र. ९९ मधील ३ नुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व विषयांसाठी एकाच वेळी त्याच परीक्षेस प्रविष्ठ होणारा एखादा उमेदवार एका किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण होईल तर एका किंवा अधिक विषयात त्याला कमी गुण मिळाले असतील तर, एकूण कमाल १५ गुण परंतु कोणत्याही एका विषयात १०% पेक्षा जास्त असणार नाहीत इतक्या अनुग्रह गुणांची त्याला सवलत देण्यात यावी. ही सवलत फक्त घेतलेल्या एकूण विषयांपैकी ३ विषयांपुरतीच मर्यादित असेल. त्याचप्रमाणे इ. ११वी साठी १५ गुण अनुग्रह देण्यात येऊन इ.१२वी प्रमाणे अनुग्रह गुण इ.११वीला देण्यात यावेत.

...२...

या पत्रासोबत आपणास शासन पत्राची छायाप्रत देण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालये व उच्च माध्यमिक शाळा यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे व त्याची प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. याबाबत संबंधितांकडून अंमलबजावणी होत असलेबाबतचा अहवाल देखील या कार्यालयास सादर करावा.

सचिव
राज्य मंडळ,पुणे-०४

प्रत-माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी

शाखाधिकारी - शाखा पापुअ

शाखाधिकारी - शाखा पापुई

शाखाधिकारी - शाखा संशोधन

**महाराष्ट्र शासन**

**तात्काळ**

**क्रमांक :** परीक्षा-२०१६/प्र.क्र.१८९/एसडी-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २८ ऑक्टोंबर,२०१६.

**प्रति,**

सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे.

**विषय :-** उच्च माध्यमिक इ.११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी उत्तीर्णतेचे सुधारित नियम (Rules of promotion) लागू करणेबाबत.

**संदर्भ:-** आपले पत्र क्र.रा.म./परीक्षा-२/३०६०,दि.२०/५/२०१६.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की,राज्यमंडळ नियमावली नियम क्र.९९ मधील ३ नुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी असणा-या तरतूदीप्रमाणे इ.११ वी च्या विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी पूर्वीच्या निकषानुसार असलेले ३० गुण बदलून १५ गुण अनुग्रह गुण म्हणून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(प्रमोद पाटील)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सहा. सचिव
सचिव
आवक क्रमांक - ६८९
शाखा :-